# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा बुधवार दि.०५/०७/०६ रोजी दुपारी १-०० वा.** विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्य |
| ३) | ॲडव्होकेट श्री. रामदास पी. सब्बन. | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख. | सदस्य |
| ५) | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ - पदसिध्द. | सदस्य |
| ६) | प्राचार्य जे. के. बिले. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर. | सदस्य |
| ८) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार. | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही. साठे. | सदस्य |
| ११) | श्री. पी. एम. हिरेमठ. | सदस्य |
| १२) | श्री. व्ही. तिरुपती. | सदस्य |
| १३) | प्राचार्य बी. पी. रोंगे. | सदस्य |
| १४) | डॉ. डी. डी. रणनवरे. | सदस्य |
| १५) | श्रीमती एम. एस. कदम. | सदस्य |
| १६) | वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १७) | परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १८) | डॉ. पी. बी. कुंभार - कुलसचिव | सचिव |

सभेच्या सुरुवातीला सचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले. मा.अध्यक्ष यांनी सदस्यांचे स्वागत करुन सभागृहातील प्रत्येक सदस्यांचा वेळ महत्वाचा असल्याने आणि सदस्यांचा बहुमूल्य वेळ वाया जावू नये म्हणून विषयाला अनुसरुन चर्चा व्हावी असे मा.अध्यक्ष यांनी सदस्यांना सुचविले. यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**[कृ.मा.प.]**

सभेतील विषयांवर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

विषय क्र. [ १ ] दि. २७ मार्च २००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्र. [ १ ] पान क्र. २ वर शेवटच्या परिच्छेदामध्ये दिल्याप्रमाणे प्रसिध्दीला बातमी जाताना through proper channel मा.कुलगुरु यांच्या परवानगीने व मा.कुलसचिव यांच्या सहीने जाणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये झालेली चर्चा किंवा इतर ज्या बाबी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावयाच्या असतात. त्या मा.कुलगुरु यांच्या परवानगीने मा.कुलसचिव यांच्या सहीनेच प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राकडे पाठवाव्यात असे डॉ. एल. पी. देशमुख यांनी सांगितले.

सभेच्या कार्यवृत्तांतामध्ये उपस्थित सदस्यांचीच नांवे लिहावीत. विनंतीनुसार अनुपस्थित रहाणाऱ्या सदस्यांची माहिती परिच्छेदामध्ये लिहावी असे प्राचार्य बी. पी. रोंगे यांनी सुचविले.

विषय क्र. ६ बाबत नियमावली तयार केली आहे काय? अशी प्राचार्य जे. के. बिले यांनी विचारणा केली असता, नियमावली तयार करण्यात येणार आहे असे संचालक म. व वि. वि. मं. यांनी यावेळी सांगितले.

विषय क्र.९ वर सर्व सदस्यांनी सर्वार्थाने चर्चा करुन या विषयावर लवकरात लवकर तोडगा काढावा असे ठरले.

विषय क्र.१० बाबत सर्व सदस्यांनी चर्चा करुन यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सभेत सादर करावा असे ठरले.

ज्या महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्यांची पदे भरलेली नाहीत त्या महाविद्यालयांना आणि संस्थाचालकांना नियमित प्राचार्यांची पदे भरण्याबाबत पुन्हा सत्वर कळवावे असे सभेत सुचविण्यात आले.

[कृ.मा.प.]

**विषय क्र. [ २ ] जादा कामाचा मोबदला कर्मचाऱ्यांना देण्यासंदर्भात उपसमितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

दि. २७/३/२००६ रोजी सकाळी ११-३० वा. झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये विषय क्र.३ नुसार जादा कामाचा मोबदला कर्मचाऱ्यांना मिळण्याबाबत विषय मांडण्यात आलेला होता. या विषयावर खालील उपसमितीचे गठन करावे व या उपसमितीने अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पुढील सभेत सादर करावा असा ठराव करण्यात आला.

१) प्रा. बी. पी. रोंगे - अध्यक्ष.
२) श्रीमती. एन. व्ही. साठे - सदस्या.
३) डॉ. सी. बी. कोळेकर - सदस्य.
४) डॉ. एल. पी. देशमुख - सदस्य.
५) डॉ. पी. जी. मोरे - सदस्य.

या उपसमितीने दि.१२/४/२००६ रोजी दुपारी ३-०० वा.सभा घेवून जादा कामाचा मोबदला कर्मचाऱ्यांना देण्याबाबतचे काही निकष ठरविले व अहवाल तयार केला असून सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [ २ ] जादा कामाचा मोबदला (Overtime) कर्मचाऱ्यांना देण्यासंदर्भात उपसमितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेने मान्य करावा असे ठरले.**

**विषय क्र. [ ३ ] खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी...**

(टिपणी - खरेदी समितीची बैठक दिनांक ८/६/०६ व ९/६/०६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या कार्यवृत्तांतास वित्त व लेखा समितीने दि.१५/६/०६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली असून, सदरचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करावा अशी शिफारस करण्यात आली.

सबब मान्यतेसाठी सादर.)

**ठराव क्र. [ ३ ] खरेदी समितीने मान्यता दिलेला काटकर मेक जनसेट खरेदी करण्याऐवजी नामांकित किर्लोस्कर मेक जनसेट खरेदी करावा आणि सदरचा जनसेट खरेदी करण्यासाठी मा.प्राचार्य श्री. बी. पी. रोंगे यांनी खरेदी समितीसमवेत संबंधीतांशी चर्चा करावी असे ठरले तसेच जनसेट खरेदीचा विषय वगळून खरेदी समितीचा कार्यवृत्तांत मान्य करावा असे ठरले.**

**विषय क्र. [ ४ ] युनायटेड वेस्टर्न बँकेतील खाते क्र.५५ बंद करणेबाबत...**

(टिपणी - सोलापूर विद्यापीठ स्थापन होण्यापूर्वी युनायटेड वेस्टर्न बँकेमध्ये Dy.Registrar,Shivaji University, P.G.T.C. Solapur या नावाने खाते क्र. ५५ चालू होते. सोलापूर विद्यापीठ स्थापन झालेनंतर याच खात्यावर व्यवहार झालेले आहेत. तथापी शिवाजी विद्यापीठाच्या वार्षिक लेखे (२००४-०५) मध्ये सदर खात्याची नोंद दिसून येत नाही. तरी सदर खाते क्र.५५ बंद करुन त्या खात्यावरील रक्कम सोलापूर विद्यापीठाच्या खाते क्र.२ मध्ये वर्ग करण्यास मान्यता असावी.)

**[कृ.मा.प.]**

**ठराव क्र. [ ४ ]** **युनायटेड वेस्टर्न बँकेतील खाते क्र. ५५ बंद करुन त्या खात्यावरील रक्कम विद्यापीठाच्या खाते क्र. २ मध्ये वर्ग करण्यास मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. [ ५ ]** **मुदत बंद ठेवीबाबत...**

(टिपणी - महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार विद्यापीठांच्या मुदत बंद ठेवी ह्या राष्ट्रीयकृत बँक व शेड्युल्ड बँकेत ठेवण्यास मान्यता आहे. सोलापूर विद्यापीठाच्या मुदत बंद ठेवी सेंट्रल बँक ऑफ इंडिया व युनायटेड वेस्टर्न बँक लि. (शेड्युल्ड बँक) मध्ये ठेवण्यात आल्या आहेत. सदरची बाब माहितीसाठी व मान्यतेसाठी सादर.)

**ठराव क्र. [ ५ ]** **मुदत बंद ठेवी सेंट्रल बँक ऑफ इंडिया व युनायटेड वेस्टर्न बँक लि. (शेड्युल्ड बँक) मध्ये ठेवण्यात आल्या आहेत याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेऊन त्यास मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र. [ ६ ]** **विद्यापीठाचे बँक खातेबाबत..**

(टिपणी : सोलापूर विद्यापीठाचे खालील बँकांमध्ये खाते आहेत.

| अ.क्र. | बँकेचे नांव | खाते क्र. | तपशील |
|---|---|---|---|
| १) | सेंट्रल बँक ऑफ इंडिया<br>कोंडी शाखा | १११<br>(करंट अकौंट) | पगारासाठी. |
| २) | सेंट्रल बँक ऑफ इंडिया<br>कोंडी शाखा | ६<br>(सेव्हींग्ज् अकौंट) | सरकारी अनुदान, इमारत बांधकामासाठी. |
| ३) | स्टेट बँफ ऑफ इंडिया<br>बाळीवेस शाखा | ०१०००/००५७५१ | परदेशी देणग्यासाठी. |
| ४) | युनायटेड वेस्टर्न बँक<br>विद्यापीठ विस्तारीत शाखा | २<br>(करंट अकौंट) | विद्यापीठ निधी. |
| ५) | युनायटेड वेस्टर्न बँक<br>विद्यापीठ विस्तारीत शाखा | १८७ | विद्यापीठ विकास निधी. |
| ६) | युनायटेड वेस्टर्न बँक<br>विद्यापीठ विस्तारीत शाखा | १९८ | सरकारी अनुदान, कम्पौंडसाठी. |

तरी वरीलप्रमाणे विद्यापीठाच्या बँकेतील खाते माहितीसाठी आणि मान्यतेसाठी.

**ठराव क्र. [ ६ ]** **सेंट्रल बँक ऑफ इंडिया कोंडी शाखेतील खाते क्र. १११ (करंट अकौंट), खाते क्र. ६ (सेव्हींग्ज् अकौंट), स्टेट बँक ऑफ इंडिया बाळीवेस शाखेतील खाते क्र. ०१०००/००५७५१, युनायटेड वेस्टर्न बँक विद्यापीठ विस्तारीत शाखेतील खाते क्र. २ (करंट अकौंट) तसेच खाते क्र. १८७ व खाते क्र.१९८ याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेऊन त्यास मान्यता द्यावी असे ठरले.**

[कृ.मा.प.]

**विषय क्र. [ ७ ] सोलापूर विद्यापीठ परिसराला "ज्ञानगंगोत्री" नाव सुचविल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

आपल्या देशातील बऱ्याच विद्यापीठांचे परिसर योग्य अशा नावाने ओळखले जातात. उदा. शिवाजी विद्यापीठ परिसर "विद्यानगर", स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड) परिसर "ज्ञानतीर्थ" या नावाने ओळखले जातात. व्यवस्थापन परिषदेचे मान्यवर सदस्य डॉ. पी. जी. मोरे यांनी सोलापूर विद्यापीठाच्या परिसराला "ज्ञानगंगोत्री" हे नाव सुचविले आहे.

सबब, सोलापूर विद्यापीठाच्या परिसराला "ज्ञानगंगोत्री" हे नाव देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [ ७ ] सोलापूर विद्यापीठ परिसराला नाव देण्याबाबत विद्यापरिषदेच्या आणि व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पत्र पाठवून त्यांच्याकडून सूचना मागवून घेऊन सदरचा विषय पुढील सभेत सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. [ ८ ] सोलापूर विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधीबाबत...**

(टिपणी - कर्मचाऱ्यांच्या पगारातून दरमहा रु.१०/- सभासद कल्याण निधी म्हणून कपात केला जातो. तो निधी सध्या विद्यापीठाच्या निधीमध्ये जमा आहे. कल्याण निधीसाठी घटना व नियमावली तयार केलेली असून त्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता असावी. या घटना व नियमावलीनुसार कल्याण निधीसाठी स्वतंत्र खाते बँकेत उघडणे आवश्यक आहे. तरी कल्याण निधीची घटना व नियमावली व मा.अध्यक्ष, सोलापूर विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधी या नावाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया,कोंडी शाखा येथे उघडयास मान्यतेसाठी सादर.

तसेच विद्यापीठाचा सभासद कल्याण निधीसाठीचा हिस्सा ठरविण्याची बाब विचारार्थ.)

**ठराव क्र. [ ८ ] सोलापूर विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधीसाठी घटना व नियमावली तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीमध्ये डॉ. पी. जी. मोरे व डॉ. एल. पी. देशमुख यांचा समावेश करुन घटना व नियमावली दुरुस्त करुन सदरचा विषय पुढील सभेत सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. [ ९ ] राष्ट्रीय संगोष्टी दि. ८ व ९ जुलै २००६ रोजी आयोजित केल्याची बाब माहितीसाठी.**

दक्षिण भारत हिंदी परिषद कोल्हापूर व सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सहावे राष्ट्रीय अधिवेशन (संगोष्टी) दि. ८ व ९ जुलै २००६ रोजी श्री. वीर तपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामी बृहन्मठ, होटगी मंदीर येथे संपन्न होणार आहे.

या राष्ट्रीय संगोष्टीमध्ये सोलापूर विद्यापीठाचा सहभाग आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**[कृ.मा.प.]**

**ठराव क्र. [ ९ ]** **दक्षिण भारत हिंदी परिषद कोल्हापूर व सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सहावे राष्ट्रीय अधिवेशन (संगोष्टी) दि. ८ व ९ जुलै २००६ रोजी श्री. वीर तपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामी बृहन्मठ, होटगी मंदीर सोलापूर येथे आयोजित केलेले आहे. याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली आणि त्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या रकमेबाबत मागणीनुसार विचार करुन मा. कुलगुरु यांनी निर्णय घ्यावा असे ठरले.**

**विषय क्र.[ १० ]** **बांधकाम समितीच्या दि. २५/५/०६ रोजी दुपारी ३-०० वा.झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.**

बांधकाम समितीची दि. २५/५/०६ रोजी दुपारी ३-०० वा. मा.कुलगुरु यांच्या दालनामध्ये सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.[ १० ]** **बांधकाम समितीच्या दि.२५/५/०६ रोजी दुपारी ३-०० वा. झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र.[ ११ ]** **कॉम्प्युटर सायन्स विभागाकडील हंगामी शिक्षकांना गुणवत्त्च्या निकषावर कंत्राटी पध्दतीच्या (Contractual Appointment with scale) नेमणूका देणेबाबत...**

दि. २७ मार्च, २००६ रोजी दुपारी १२-३० वा. झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र. ५ वरील सभेच्या ठरावानुसार संपूर्ण तपशीलासह माहिती (एकूण उत्पन्न व एकूण खर्च इ.) सोबत जोडलेली आहे. सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.[ ११ ]** **विद्यापीठातील स्वावलंबी तत्वावर चालणारे विभाग आणि विविध अभ्यासक्रम, त्यांची प्रवेशक्षमता, प्रत्यक्षात किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले, पहिले वर्ष, दुसरे वर्ष, सदरच्या विभागाचे उत्पन्न व खर्च, शिक्षक आणि इतर सुविधा इत्यादी बाबींचा विचार करुन अहवाल सादर करण्यासाठी खालील समिती नियुक्त करावी असे ठरले.**

**१) प्राचार्य जे. के. बिले - अध्यक्ष**
**२) डॉ.एल. पी. देशमुख -सदस्य**
**३) डॉ. श्रीमती व्ही. जे. नाईकनवरे - सदस्या**
**४) संबंधित विभागाचे विभागप्रमुख किंवा जेथे विभागप्रमुख नसतील त्या ठिकाणी समन्वयक - सदस्य**
**५) संचालक म. व वि.वि.मं. - सदस्य**
**६) कुलसचिव - सदस्य**

**तसेच ज्या विषयाचे विभागप्रमुख नाहीत अशा ठिकाणी त्या विषयाचा समन्वयक नेमावा असे ठरले.**

<u>आयत्या वेळेचे विषय :-</u>

**विषय क्र.[ १२ ] सोलापूर विद्यापीठाकरीता विजेची एक्सप्रेस लाईन घेण्यास व येणाऱ्या प्रत्यक्ष अनुषंगिक खर्चाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

सोलापूर विद्यापीठ मौजे केगांव हद्दीत आहे. ग्रामीण भागात सध्या भारनियमन मोठ्या प्रमाणात केले जाते. त्यामुळे विद्यापीठाचे दैनंदिन कामकाज यावर भारनियमनाचा परिणाम होतो. सोलापूर विद्यापीठाचे कामकाज सुरळीत व प्रभावीपणे चालविण्याच्या दृष्टकोनातून सातत्याने अखंडित विद्युत पुरवठा होणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यापीठाच्या परिसरात वीजपुरवठा सातत्याने व अखंडित राहण्यासाठी एक्सप्रेस लाईन घेणे गरजेचे आहे. परंतु, एक्सप्रेस लाईन स्वतंत्रपणे घेण्यासाठी येणारा खर्च जास्त आहे. विद्यापीठालगत महानगरपालिकेचा जकात नाका, दूधपंढरी, अभियांत्रिकी महाविद्यालय इ. संस्था कार्यरत असून त्यांनादेखील भारनियमनाचा फटका मोठ्या प्रमाणावर बसत आहे. सदर संस्था विजेची एक्सप्रेस लाईन घेण्यासाठी उत्सुक आहे. त्यामुळे विजेची एक्सप्रेस लाईन स्वतंत्रपणे घेण्याऐवजी एकत्रितपणे म्हणजे चार संस्था मध्ये मिळून घेतल्यास एकूण येणाऱ्या खर्चापैकी विद्यापीठास चौथा हिस्सा (१/४) द्यावा लागेल. किंवा जो खर्च विजेची एक्सप्रस लाईन घेण्यासाठी येईल त्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.[ १२ ] सोलापूर विद्यापीठाकरिता विजेची एक्सप्रेस लाईन घेण्यास व त्यापोटी प्रस्तावानुसार येणाऱ्या खर्चास मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र.[ १३ ] विद्यापीठ अधिविभागातील हंगामी अधिव्याख्याते यांना डेप्युटेशन, शिष्यवृत्ती, दीर्घ काळमुदतीची रजा इ. विषयी प्रशासकीय निर्णय होणेबाबत.**

सोलापूर विद्यापीठामध्ये सरकारमान्य अधिविभागामध्ये हंगामी तत्त्वावर अधिव्याख्याते कार्यरत आहेत. काही अधिव्याख्यात्यांना वरील विषयांमध्ये नमूद केल्याप्रमाणे दिर्घकाळ मुदतीची रजा भासते. सबब, रजा विद्यापीठ नियमानुसार देता येत नाहीत. या बाबीवर प्रशासकीय व कायदेशीर निर्णय होणे गरजेचे आहे.

वरील बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र.[ १३ ] विद्यापीठ अधिविभागातील हंगामी अधिव्याख्यात्यांना Refresher Course, Summer vacation, Research Programme, Seminar & workshops ला जावयाचे झाल्यास प्रशासनाने त्यांच्या**

**रजेस मान्यता द्यावी असे ठरले.**

**[कृ.मा.प.]**



**विषय क्र.[ १४ ]** **दि. २९/६/०६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

दि. २९/६/०६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत वित्त व लेखा समितीसमोर ठेवून त्यास मान्यता घेणे गरजेचे आहे. परंतु, वित्त व लेखा समितीची सभा नजीकच्या काळात होणार नसल्याने मा. कुलगुरु यांनी वित्त व लेखा समितीच्या वतीने मान्यता दिलेली आहे दि.२९/६/०६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.[ १४ ]** **दि. २९/६/०६ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र.[ १५ ]** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ..**

सोलापूर विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेंजिस इन स्टाफ मान्यता देण्यासाठी समिती गठीत केली होती. सदर समितीने छाननी करुन अहवाल दिलेला आहे. सदरचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.[ १५ ]** **चेंजिस इन स्टाफच्या समितीने सादर केलेल्या महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता द्यावी असे ठरले.**

**विषय क्र.[ १६ ]** **महाविद्यालयांच्या नावात बदल करणेबाबत..**

मागास समाजसेवा मंडळ, सोलापूर यांचे महाविद्यालयाच्या नावात बदल करुन महाविद्यालयाचे नाव श्री सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नेहरु नगर,सोलापूर-४. असे ठेवण्यास मान्यता देण्याबाबत सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ आणि मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र.[ १६ ]** **महाविद्यालयांच्या नावात बदल करण्याबाबतच्या विषयाची संपूर्ण प्रशासकीय कार्यवाही करुन सदरचा विषय पुढील सभेत ठेवावा असे ठरले.**

**विषय क्र.[ १७ ] क्रीडा अश्वमेध व सांस्कृतिक चळवळीकरिता सन २००६-०७ पासून वाढीव फी आकारण्याबाबत...**

सोबत मा. राज्यपालांचे सचिव यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेले पत्र क्र. CS/Ashwamedha/०५(६०३६)/३४४१ दि.१६-१२-२००५ अवलोकनार्थ ठेवले आहे.
सदर पत्रान्वये मा. सचिवांनी राजभवन कार्यालयामध्ये दि. ०७ जुलै २००५ रोजी आयोजित केलेल्या सल्लागार समितीच्या अहवालाची प्रत पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयास पाठविलेली आहे.
समितीच्या अहवालानुसार सन २००६-०७ पासून अश्वमेध फीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

- रु.१०/- ऐवजी रु.२०/- प्रमाणे अश्वमेध फी आकारण्यात यावी.
- आकारण्यात आलेल्या फीमधून रु.४/- प्रत्येक विद्यार्थ्यांमागे अश्वमेध यजमान विद्यापीठास पाठवावी.
- रु.२/- प्रत्येक विद्यार्थ्यांमागे आंतरविद्यापीठीय सांस्कृतिक चळवळीच्या कार्यक्रमासाठी यजमान विद्यापीठास पाठवावी.
- जमा रु.२०/- पैकी महाविद्यालयाने रु.३/- प्रमाणे क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचा हिस्सा म्हणून ठेवावा व रु.३/- क्रीडा विकासासाठी वापरावेत.
- महाविद्यालयांनी रु.८/- विद्यापीठास पाठवावेत त्यामधून विद्यापीठाने रु.४/- क्रीडा व सांस्कृतिक विकासासाठी व रु.४/- कायमस्वरुपी फंड म्हणून ठेवावा व तो भविष्यात सल्लागार समितीने आयोजित केलेल्या कामासाठी वापरावे.

सदर पत्रावर तातडीने कार्यवाही करावयाची असल्याने विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरु यांनी कार्यवाही केलेली आहे.

सदर पत्रावर तातडीने कार्यवाही करावयाची असल्याने विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरु यांनी कार्यवाही केलेली आहे.

सबब सदर विषय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र.[ १७ ] क्रीडा अश्वमेध व सांस्कृतिक चळवळीकरिता सन २००६-०७ पासून वाढीव फी आकारण्याबाबत मा.कुलपती यांचे सचिव यांच्या**

**कार्यालयाकडून प्राप्त झालेले पत्र क्र.CS/Ashwamedha/०५/(६०३६)/३४४१ दि.१६/१२/०५ वर मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**[कृ.मा.प.]**



**विषय क्र.[ १८ ] दि. २७ मार्च, २००६ च्या विद्यापीठातील शिक्षक भरतीच्या जाहिरातीबाबत.**

दिनांक २८ जुलै २००५ आणि दिनांक २७ मार्च २००६ रोजी दैनिक सकाळमध्ये शिक्षक भरतीची जाहिरात प्रसिध्द केलेली होती. अर्जदार उमेदवाराच्या मुलाखती झाल्या. पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याने रिक्त पदे भरली गेली नाहीत. पुन्हा विद्यापीठातील रिक्त असलेल्या शिक्षक पदांची जाहिरात प्रसिध्द केलेली असून भरतीची प्रक्रिया सुरु आहे.

सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र.[ १८ ] सदरच्या विषयाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

परीक्षा नियंत्रक व वित्त व लेखा अधिकारी यांची नेमणूक २ वर्षासाठी Ad-hoc basis वर केलेली असल्याने त्यांची मुदत संपण्यापूर्वी ३ महिने अगोदर रिक्त होणाऱ्या पदावर नियमानुसार नेमणूकीची प्रक्रिया सुरु करावी.

शासनस्तरावर प्रलंबित प्रश्नासंदर्भात शासनाशी पत्रव्यवहार व पाठपुरावा करण्यासाठी प्राचार्य जे. के. बिले आणि ॲडव्होकेट रामदास सब्बन यांची समिती नियुक्त करावी असे ठरले.

मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सचिव यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**डॉ. इरेश स. स्वामी**
**अध्यक्ष**